Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 1, March 2023; Pages 40 –45
DOI: 10.5281/zenodo.16218149

Original Research Article

# महाराष्ट्रात ओबीसी आरक्षण चळवळ

**प्रा. मनोज ह. होले**

सहाय्यक प्राध्यापक, कॉलेज ऑफ सोशल वर्क, कामठी जि. नागपूर ४४१००१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* holemanoj023@gmail.com

Received: 20 February, 2023 | Accepted: 24 March, 2023 | Published: 26 March, 2023

**गोषवारा**

महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा कळीचा मुद्दा बनला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुकीत ओबीसी समाजघटकातील उमेदवारांना दिले जाणारे आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून देता येणार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपासहित घमासान चर्चा सुरू झाली आहे. सत्ताधारी महाविकास आघाडीने अगदी जाणीवपूर्वक हे आरक्षण घालवले असा आरोप विरोधी पक्षांनी केला, तर केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपने आम्हाला 'इम्पेरिकल डाटा' दिला नाही, असा आरोप करून महाराष्ट्र सरकारने केंद्राच्या माथी खापर फोडण्याचा प्रयत्न केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून काही प्रमाणात हे आरक्षण वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार आता या निवडणुका ५० टक्के मर्यादेच्या अधिन राहून पार पडतील. सर्वच निवडणुकांना जीवनमरणाचा प्रश्न बनवलेल्या राजकीय पक्षांना या अध्यादेशाने काही अंशी दिलासा मिळाला आहे.

**संकल्पनात्मक शब्दांचा अर्थ: (Keyword):** मागासवर्गीय प्रवर्ग, सामाजिक आरक्षण, अध्यादेश, सक्षमीकरण

## १. प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४० अन्वये सरकारने ओबीसींच्या कल्याणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. भारताच्या हद्दीतील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (चकएक्) च्या परिस्थितीची आणि ते कोणत्या अडचणींतर्गत काम करतात याची चौकशी करण्यासाठी आणि त्या चरणांसाठी शिफारसी करण्यासाठी राष्ट्रपती अशा व्यक्तींचा समावेश असलेला आयोग नेमू शकतात. अशा अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत संघ किंवा कोणत्याही राज्याने निर्णय घेतला पाहिजे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या १९९२ च्या निर्णयामुळे नागरी सेवेतील २७ टक्के पदे ओबीसींच्या सदस्यांसाठी राखीव ठेवण्याची

आवश्यकता होती. लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी माहिती दिली की, जानेवारी २०१६ पर्यंत केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये ओबीसींची टक्केवारी २१.५७ टक्के आहे. प्रस्तूत शोध निबंधात महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## २. संशोधनाची उद्दीष्ट्ये

a) महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसी आरक्षणाचा आढावा घेणे.
b) ओबीसी आरक्षणाची सद्यस्थिती जाणून घेणे.
c) महाराष्ट्राच्या ओबीसी चळवळीचा इतिहास समजावून घेणे.
d) भारतीय राज्यघटनेतील ओबीसी चळवळीच्या तदतूदीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## ३. संशोधनाची गृहितके

a) ओबीसी आरक्षण हा महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाचा सामाजिक व राजकीय विषय आहे.
b) सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संविधानात ओबीसी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.
c) ओबीसी प्रवर्गाच्या राजकीय आरक्षणातील समतोल साधण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात कोणत्याही सरकारने केला नाही.

## ४. इतर मागासवर्गीय आरक्षण

इतर मागासवर्गीय वर्ग (OBC) ही एक सामूहिक संज्ञा आहे. जी भारत सरकार शैक्षणिक किंवा सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायांचे वर्गीकरण करण्यासाठी वापरली जाते. हे सामान्य जाती, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती सोबत भारतातील लोकसंख्येच्या अनेक अधिकृत वर्गीकरणांपैकी एक आहे. १९८० च्या मंडल आयोगाच्या अहवालानुसार ओबीसींचा समावेश देशाच्या लोकसंख्येच्या ५२ टक्के असल्याचे आढळून आले आणि २००६ मध्ये राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने ४१ टक्के असल्याचे निश्चित केले. भारतात ओबीसींची नेमकी संख्या किती आहे, यावरून जोरदार वाद सुरू आहेत; साधारणपणे ते मोठ्या प्रमाणात असण्याचा अंदाज आहे, परंतु अनेकांचा असा विाास आहे की ते मंडल आयोग किंवा राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाने जाहीर केलेल्या आकडेवारीपेक्षा जास्त आहे.

उच्च-ओबीसी म्हटल्या जाणाऱ्या ओबीसींच्या या विभागात, शैक्षणिक प्राप्ती आणि राजकीय एकत्रीकरणातही असमानता आहे. यादव हे राजकीय यशात सर्वात जास्त लाभार्थी असताना, त्यांच्या राजकीय प्रगतीमुळे जातीय पदानुक्रमात त्यांची स्थिती सुधारली नाही आणि त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसारही अवधिया कुर्मी, कोरी आणि बनिया सारख्या अधिक शैक्षणिकदृष्ट्या प्रगत समुदायांच्या तुलनेत कमी राहिला. यादव इतर उच्च-ओबीसींच्या विपरीत गुरेढोरे पाळण्याशी संबंधित असल्याने, जे मालक शेती करणारे होते, जमीनदारांच्या शेतात घुसखोरी करणे आणि नंतरच्या लोकांशी नियमित संघर्ष करणे हे त्यांच्या अस्तित्वासाठी एक आव्हान होते. सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी इतर मागासवर्गीयांची जमवाजमव वेगवेगळया उत्तर भारतीय राज्यांमध्ये एकाच गतीने आणि त्याच पद्धतीने दिसून आली नाही. उत्तर भारतात, राजस्थान आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्येही मागासवर्गीय लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे, तरीही, बिहारसारख्या राज्यांमध्ये या राज्यांमध्ये कोणतीही हालचाल झालेली नाही. अनेक निरीक्षकांनी नमूद केले आहे की बिहारमध्ये उच्च ओबीसी उदा. कोरी, कुर्मी आणि यादव यांची राजकीय उन्नती जमीन सुधारणा आणि शेतकरी चळवळींशी हातमिळवणी करून या तीन जातींना लाभली. या चळवळींनी त्यांचे राजकीय स्थानच बदलले नाही तर त्यांचे सामाजिक-आर्थिक व्यक्तिचित्रही बदलले. तथापि, मध्य प्रदेशच्या बाबतीत, भारतीय जनता पक्ष आणि भारतीय

राष्ट्रीय काँग्रेस सारख्या राष्ट्रीय राजकीय पक्षांनी राज्याच्या राजकीय रचनेत मागासवर्गीयांना अशा प्रकारे सामावून घेतले की कोणत्याही प्रकारची सामाजिक-राजकीय चळवळ होण्यापासून रोखली जाते

२०१८ च्या घटनादुरुस्तीनंतर, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना ओबीसींमध्ये समाविष्ट करण्याचा अधिकार राज्यांना नाही तर केवळ केंद्र सरकारला आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश या नवीन कायद्यामुळे रद्द होईल. येथे हे नमूद करणे प्रासंगिक ठरेल की सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) वर्गात स्थान देण्यात आले आहे. त्यांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

## ५. ओबीसीमध्ये सामील होण्याचे फायदे

आरक्षण विषयाबाबत लोकांमध्ये विविध प्रकारचे समज-गैरसमज आहेत. याबाबत अधिक जाणून घेण्यासाठी बीबीसी मराठीने ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांच्याशी संवाद साधला. ते सांगतात, 'आरक्षण तीन प्रकारचे आहे. राजकीय प्रतिनिधित्व (निवडणुकीतील जागा), शैक्षणिक आरक्षण आणि नोकऱ्यांतील आरक्षण. घटनेच्या कलम ३३४ अन्वये यातील राजकीय आरक्षणाला फक्त दहा वर्षांची मुदत घातलेली आहे. पण शिक्षण आणि नोकरीतल्या आरक्षणासाठी घटनेने कोणतीही मुदत ठरवून दिलेली नाही. १९९२ साली देशात मंडल आयोग लागू झाला. त्यानंतर १९९४ साली 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१' मध्येही दुरुस्ती करण्यात आली आणि कलम १२ (२) (सी) समाविष्ट करून इतर मागासवर्गीयांना २७ टक्के राजकीय आरक्षणाची तरतूद करण्यात आली. म्हणजेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २७ टक्के उमेदवार हे इतर मागासवर्गीयांमधून (ग्रएक्) असणं बंधनकारक करण्यात आलं.

केंद्र आणि राज्य सरकार इतर मागासवर्गीय (ओबीसी) लोकांच्या उन्नतीसाठी अनेक कार्यक्रम आणि योजना राबवतात. ओबी श्रेणीतील लोकांना शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ दिला जातो, जो खालीलप्रमाणे आहे-

a) आयएएस आणि आयपीएससह इतर नोकऱ्यांमध्ये आणि आयआयटी आणि आयआयएम सारख्या सरकारी उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये २७ टक्के आरक्षणाचा लाभ उपलब्ध आहे.
b) सहसा, यूपीएससी सिव्हिल सर्व्हिससह इतर परीक्षांमध्ये वयात सूट दिली जाते.
c) सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षेत बसण्याची अधिक संधी मिळते.
d) त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किंवा प्रवेशासाठी निश्चित केलेल्या किमान कट-ऑफ गुणांमध्ये सूट दिली जाते जेणेकरून ते परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतील.

## ६. महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण

वास्तविक पाहता ओबीसींचे राजकीय आरक्षण न्यायप्रविष्ट का झाले, यावर मात्र कोणतेही सरकार बोलत नाही. प्रत्यक्षात केंद्र आणि राज्य सरकारे यांच्या वेळकाढू धोरणाचा हा परिणाम आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. राज्यघटना अमलात आल्यानंतर (२६ जानेवारी १९५०) हे आरक्षण दहा वर्षांसाठी असेल अशी तरतूद होती. परंतु सर्वच सत्ताधाऱ्यांनी मर्यादा वाढवत वाढवत, ती आता जानेवारी २०३०पर्यंत केलेली आहे. एक राजकीय मेहरबानी म्हणून हे आरक्षण बिनबोभाट चालू आहे. परंतु आता ते न्यायप्रविष्ट झाल्यानंतर केंद्र व राज्य सरकारांच्या मर्यादा अधिकच उघड्या पडल्या. मागीस सात दशकांपासून विविध आयोगांनी ज्या ज्या सूचना व शिफारशी सरकारला केल्या होत्या, त्याकडे

सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे आज न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. १९५०पासून आजतागायत आपण जातनिहाय जनगणना का केली नाही, या प्रश्नात हे आरक्षण न्यायप्रविष्ट होण्याचे उत्तर आहे. आपल्या जनाधाराला सोयीस्कर ठरेल, पर्यायाने राजकीय हितसंबंधांना अनुकूल ठरतील अशीच सवंग लोकप्रियतेवर आरूढ होणारी धोरणे सतत कायम राहिल्यामुळे आपण जातीवर आधारित लोकसंख्या जाणीवपूर्वक तपासलेली नाही.

२०११ मध्ये जी जनगणना झाली, ती जातनिहाय झालेली नाही. फक्त सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी काही पैलूंचा अभ्यास करण्यात आला होता. याचा अर्थ लोकसंख्यानिहाय सर्व जातीसमूहांचे प्रतिनिधित्व त्यातून स्पष्ट होत नाही. याच आधारावर केंद्र सरकारने सदरील अहवाल परिपूर्ण नाही, त्यातील आकडेवारीत प्रचंड त्रुटी आहेत, परिणामी 'इम्पेरिकल डाटा' म्हणून त्याचा आधार घेता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयात सांगितले आणि घटक राज्यांनी ती आकेडवारी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. पर्यायाने मागील ९० वर्षांपासून (१९३१) ओबीसी लोकसंख्या आहे त्या स्थितीत स्वीकारण्यात आली. आता संबंधित आकडेवारीला न्यायालयात आव्हान दिल्यामुळे हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केंद्र व राज्यांना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता येणार नसल्यामुळे २७ टक्के आरक्षणाची विभागणी कशी करावी, हा राज्यांसमोरील एक पेचप्रसंग आहे.

## ७. विविध आयोगांच्या शिफारशी व सूचना

१९५१ मध्ये पहिली जनगणना झाल्यानंतर १९५३मध्ये केंद्र सरकारने कालेलकर आयोग स्थापन केला होता. या आयोगाने आपल्या अहवालात इतर मागासवर्गीय समाजघटकांची पुढील जनगणनेत जातिनिहाय लोकसंख्या निश्चित केली जावी, अशी तत्कालीन नेहरू सरकारला शिफारस केली होती. परंतु हा अहवालच गुंडाळून ठेवला गेल्यामुळे देशातील ओबीसी समाजघटकांची लोकसंख्या किती व त्यांचे प्रतिनिधित्व किती हे निश्चित होऊ शकले नाही. पुढे दोन जनगणना झाल्या, पण त्या जातिनिहाय झाल्या नाहीत. १९७८ मध्ये आलेल्या मंडल आयोगानेदेखील देशात जातिनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी सूचना सरकारला केली होती. पुढे इंदिरा गांधींचे सरकार आले व मंडल आयोग बासनात गुंडाळून ठेवण्यात आला. १९९० मध्ये व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला, मात्र १९९२ मध्ये त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. तोच इंद्रा साहनी खटला म्हणून ओळखला जातो. त्यावर निर्णय देताना न्यायालयाने ५० टक्क्यांची मर्यादा घातली. मात्र दोन्ही आयोगाने जातिनिहाय जनगणनेची जी शिफारस केली होती, त्यावर न्यायालयाने कुठलेही वक्तव्य केले नाही. मात्र ओबीसीकरण निश्चित करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या पद्धतीवर नाराजी व्यक्त केली होती. या आरक्षणात सुसूत्रता आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी लवकरात लवकर आयोग स्थापन करावेत, अशी सूचना केली होती.

याच काळात (१९९२-९३) केंद्र सरकारने राज्यघटनेत ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थेत इतर मागासवर्गीयांसाठी एकत्रित ५० टक्के आरक्षण केवळ विवेकावर आधारित अमलात आणले. मात्रे ते लागू करताना संवैधानिक व कायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष करून राजकीय मेहरबानीच्या स्वरूपात हे राजकीय आरक्षण लागू केले. ओबीसी समाजघटकांत असलेल्या २२८ जातींच्या राजकीय मागासलेपणाचा कसलाही तुलनात्मक व प्रमाणात्मक अभ्यास न करता सरळसरळ ५० टक्के आरक्षण लागू करण्यात आले. उपरोक्त घटनादुरुस्त्यांनुसार बहुतांश घटक राज्यांनी या संदर्भात कायदे केले. परंतु ते करताना सदरील समाजघटकांचा सामाजिक-राजकीय मागासलेपणा शास्त्रीय पद्धतीने तपासण्यात आला नाही. न्यायालयाने यावरच बोट ठेवत 'इम्पेरिकल डाटा' तयार करूनच राजकीय आरक्षण दिले जावे, अशी भूमिका घेतली आहे.

१९९२ पासून आजतागायत ओबीसी प्रवर्गाच्या राजकीय आरक्षणातील समतोल साधण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात कोणत्याही सरकारने केला नाही. तत्त्वत: जागांचे विभाजन केले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र राजकीयदृष्ट्या प्रस्थापित व आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत असलेल्या केवळ पाच टक्के समाजघटकांनीच राजकीय आरक्षणाचे लाभ उचलले आहेत. राज्यकर्त्यांनी व विविध राजकीय पक्षांनी आपल्या व्होट बँकेसाठी सतत राजकीय तडजोडी करत दबंग ओबीसी जातींचेच राजकीय हितसंबंध जोपासले आहेत. ओबीसी प्रवर्गात महाराष्ट्रात २२८ जातीसमूह आहेत असे गृहित धरले तरी, त्यातील राजकीय आरक्षणाचे लाभधारक किती आहेत आणि त्यांची टक्केवारी किती आहे, हे सरकार आज सांगू शकत नाही.

२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात ओबीसीच्या राजकीय आरक्षणाबाबत एक याचिका दाखल करण्यात आली. या प्रकरणातही निर्णय देताना न्यायालयाने 'इम्पेरिकल डाटा' गोळा करून त्यानुसार राजकीय प्रतिनिधित्व देण्यात यावे, याचा पुनरुच्चार केला. केंद्र व राज्य सरकारे याबाबत फारशी अनुकूल नसल्यामुळे न्यायालयाने मर्यादेबाहेर देण्यात आलेले राजकीय आरक्षण रद्दबातल ठरवले. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काही ठिकाणी आरक्षण धोक्यात आले आहे. वास्तविक पहाता २०१०मध्येच हा प्रश्न निर्माण झाला होता, परंतु केंद्र व राज्य सरकारे जातिनिहाय जनगणना व लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व (प्रत्यक्षाधारित माहिती) याबाबत प्रतिकूल असल्यामुळे ओबीसी आरक्षण आज न्यायप्रविष्ट झाले आहे.

## ८. न्या. रोहिणी आयोगाचा निरीक्षणे

इतर मागासवर्गीयांची या देशातील लोकसंख्या किती व त्यांना राजकीय क्षेत्रात प्राप्त होणारे प्रतिनिधित्व किती? तसेच एकंदर ओबीसी जातींपैकी प्रत्यक्षात राजकीय आरक्षणाचे लाभधारक किती समाजघटक झालेले आहेत, याचा सांख्यिकी, शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून शासनाला शिफारशी करण्यासाठी २०१७ मध्ये न्या. रोहिणी यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग गठित झाला आहे. या आयोगाने अजूनही आपला अहवाल सरकारला सादर केलेला नाही, मात्र आयोगाचा अभ्यास जवळ जवळ पूर्ण झाल्यामुळे काही बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

ओबीसीअंतर्गत समांतर आरक्षण लागू करावे, हा आयोग नियुक्त करण्यामागचा मूळ उद्देश आहे. सध्या महाराष्ट्रात याच पद्धतीने प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न आहे. न्या. रोहिणी कमिशनच्या शिफारशीनुसार प्रचलित आरक्षणात, पर्यायाने स्तररचनेत बदल करावेत. विकसित, मध्यम, विकसनशील आणि अति अविकसित अशा चार स्तरांत आरक्षणाची टक्केवारी विभागून घ्यावी. अंतर्गत समांतर पद्धतीने आरक्षण अमलात आणले जावे, अशा शिफारशी केल्या आहेत. कारण जोपर्यंत या पद्धतीने राजकीय आरक्षणाची विभागणी होणार नाही, तोपर्यंत बहुतांश जाती वंचित राहतील. मागील तीन दशकापासून हे सिद्ध झालेले आहे. आयोगाने आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदवून शिफारस केली आहे आरक्षणाच्या माध्यमातून काही प्रबळ जातीगटच राजकीय सत्तेचे लाभ उठवत असतील तर ही बाब संविधानातील कलम १५ व १६शी पूर्णत: विसंगत ठरते. आयोगाने पुरेशा प्रतिनिधित्वाचा कसा अभाव आहे, हेदेखील काही आकडेवारी देऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते ९७ टक्के शासकीय सेवेत २५ टक्के घटकालाच प्रतिनिधित्व मिळालेले आहे. २५ टक्के नोकऱ्यांवर केवळ १० टक्के समाजघटकाला प्रतिनिधित्व आहे, तर संख्येने ९३७ व टक्केवारीत ३७ टक्के असलेल्या जातीसमूहांना शून्य टक्के प्रतिनिधित्व आहे.

## ९. निष्कर्ष

न्या. रोहिणी आयोगाचा निरीक्षणाच्या आकडेवारीतून हे स्पष्ट होते की, ओबीसी समुदायाच्या आरक्षण मिळण्यात प्रचंड असमानता निर्माण झाली आहे. राजकीय पातळीवर तर महाराष्ट्रात हे पाच टक्क्यांवर जात नाही. आपले राजकीय हितसंबंध अबाधित राखण्यासाठी शासनकर्त्यांनी ओबीसी आरक्षणाचा समाजशास्त्रीय-संख्याशास्त्रीय पद्धतीने अभ्यास जाणीवपूर्वक टाळलेला आहे. वस्तुत: आरक्षणाचे लाभधारक कोण? व त्यांची टक्केवारी किती व राजकीय प्रतिनिधित्व किती, याची समांतर पद्धतीने सांगड घातल्याशिवाय हा प्रश्न सुटणारा नाही. १९९२ पासून इतर मागासवर्ग जातींची आकडेवारी आणि त्यांचे सामाजिक स्थान व राजकीय दर्जा, याबाबत जातीनिहाय जनगणनेची मागणी होत असेल आणि आता राजकीय पटलावर त्याचे तीव्र पडसाद उमटत असतील, तर केंद्र व सर्व घटक राज्यांनी मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून हा अभ्यास करण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. ओबीसी समाज- दशा आणि दिशा, स्टडी सर्कल प्रकाशन, पुणे, २०२२.

२. मंडल आयोग- बापू राऊत, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०२३.

३. भणगे रविंद्र, आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण, डायमंड प्रकाशन, पुणे. २०१६.

४. पवार प्रकाश, सामाजिक न्यायाची संघर्षभूमी - कॉंग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड प्रकाशन, पुणे. २०१६.

५. कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय (संपा.), २००८, आरक्षण: सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. २००८

६. कराडे जगन्नाथ, आरक्षण: धोरण आणि वास्तव, सुगावा प्रकाशन, पुणे. २००५.